राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.
Website- www.sic.maharashtra.gov.in

दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अंतर्गत दाखल तक्रार

क्र.रामाआ/तक्रार/६३४/२०२३/नाशिक

तक्रारदार	प्रतिवादी
	जन माहिती अधिकारी
श्री.दर्शन रमेश लड्ढा, रा. नं.४, जयरथ रो हाऊस, वासन नगर, पाथर्डी फाटा, गामणे मळ्याजवळ,नाशिक,ता .जि .नाशिक.	अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित , व्दारका उपविभाग ,शक्ती भवन ,तिगराणीया रोड, व्दारका,नाशिक, ता.जि.नाशिक

सुनावणी दिनांक-१६/०९/२०२५

तक्रारदार यांनी दि.२२/०८/२०२३ रोजीच्या अर्जान्वये," माझे व्दितीय अपील क्र.७९/२०२२/नाशिक संदर्भात सुनावणी ही ०८/१२/२०२२ रोजी नाशिक खंड पिठात झालेली होती व त्याचा आदेश मार्च २०२३ मध्ये मला देण्यात आला होता .त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अति.कार्य.अभियंता,व्दारका उपविभाग श्री.रा.श्री.भगत यांनी माहिती एप्रिल २०२३ मध्ये दिली, सदर माहितीत मुद्दा क्रमांक ३ विषयी खोटी व चुकीची माहिती दिल्याचे मी त्यांना भेटून व फोन कॉल व्दारे तसेच प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता नाशिक शहर २ यांना जुलै २०२३ मध्ये कळवले व सत्य व खरी माहिती त्यांच्याकडे मागितलेली परंतू सदर अधिका-यांनी कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. तरी सदर प्रकरणात वरील अधि का-यांवर कडक कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.", असे नमूद करुन माहितीचा अधिकार अधिनियमांतील कलम १८(१) अंतर्गत आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे.

२. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दि.१६/०९/२०२५ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी — तक्रारदार उपस्थित होते तर विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते.

३. तक्रारदार यांनी त्यांच्या दि.१७/०८/२०२१ रोजीच्या मूळ माहिती अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

१) कार्यक्षेत्राअंतर्गत येणाऱ्या उप विभागामध्ये कृषी धोरणानुसार सप्टेंबर, २०२० पर्यंत थकबाकी गोठवण्यात आलेल्या शेतकऱ्यांची माहिती (जसे की विभागवार संप्टेबर पुर्वीची थकबाकी व बील दुरुस्त करून गोठलेली रक्कम) २)जून ते जुलै महिन्यात शेतकी बीलाविषयी प्रत्यक्ष मीटर रिडिंग घेण्यासंदर्भातील आदेश / पत्रव्यवहार या बाबत माहिती तसेच ३) कामटवाडा विभागातील ग्राहक क्रमांक ०४९१२०७०२४५८ व ०४९९९७०१७९१८ व ०४९९९७०१८८६८ या ग्राहकांची मागील ०१ वर्षाची बिल आकारणी व बिल दुरूस्ती या बाबत सविस्तर प्रक्रियेची माहिती .

४. आयोगाने, द्वितीय अपिल क्र.७९/२०२२/नाशिक संदर्भात आयोगासमोर दिनांक ०८/१२/२०२२ रोजी झालेल्या सुनावणीअंती दिनांक २२/०२/२०२३ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश पारित केलेले आहेत.

"विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त कार्यकारी अभियंता,म.रा.वि.वि.कं.मर्या.,व्दारका उपविभाग ,शक्ती भवन, तिगराणीया रोड,व्दारका,नाशिक यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १७/०८/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी ०१ विभागाची कार्यालयातील उपलब्ध माहिती विनामूल्य व्यक्तीश: पुरवावी.जी माहिती पुरविता येत नाही,त्याबाबत स्पष्ट कारणे देखील कळविण्यात यावीत."

५. सुनावणी दरम्यानचा युक्तीवाद व प्रस्तूत नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता, आयोगाने व्दीतीय अपील क्र. ७९/२०२२/नाशिक संदर्भात दि. २२/०२/२०२३ अन्वये पारित केलेल्या आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना माहिती पुरविली असल्याचे तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात नमूद केलेले आहे. म्हणजेच आयोगाच्या आदेशानूसार तत्कालीन जन माहिती अधि कारी यांनी तक्रारदार यांना माहिती पुरविली असल्याचे दिसून येते.

मात्र सदरची माहिती अपूर्ण व चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात नमूद केले आहे व याबाबतचे लेखी निवेदन देखील सुनावणीवेळी आयोगास सादर केलेले असून त्यात असे नमूद केले आहे की, विज वितरण कंपनी कडून मिळालेल्या माहिती नुसार बिलाबाबत विविध आकडेवारी नुसार माहिती समोर आली आहे ज्या मुळे दिलेली माहिती हि खोटी, दिशाभुल करणारी व चुकीची असल्याचे लक्षात येते व सदरची माहिती मी कागदोपत्री आपल्याकडे देत आहे. माहितीत असलेली तफावत मी पुढे मांडत आहे.

मुद्दा क्रमांक ३ च्या माहितीत असलेली तफावत

१) ग्राहक क्रमांक ०४९९९७०१८८६८ च्या ग्राहकाविषयी चुकीची रीडिंग माहिती दिलेली आहे. प्रत्यक्षात ६७०१ रुपये कमी केलेले असून उत्तरात फक्त २२६ रुपये कमी केल्याचे सांगितले आहे. बिलावर रुपये ६७८९ रुपये कमी करून दिले आहेत. त्यामुळे कमी केलेली खरी रक्कम व त्या आधारे आकारलेले वीज बिल यांचा ताळमेळ बसत नाही. ज्या मुळे दिलेली माहिती हि खोटी, दिशाभुल करणारी व चुकीची असल्याचे लक्षात येते

२) ग्राहक क्रमांक ०४९१२०७०२४५८ च्या ग्राहकाविषयी चुकीची रिडिंग माहिती दिलेली आहे. प्रत्यक्षात १६२०१ रुपये कमी केलेले असून उत्तरात फक्त ४६२७ रुपये कमी केल्याचे सांगितले आहे. बिलावर रूपये २८७९२ रुपये कमी करून दिले आहेत. त्यामुळे कमी केलेली खरी रक्कम व त्या आधारे आकारलेले वीज बिल यांचा ताळमेळ बसत नाही. ज्या मुळे दिलेली माहिती हि खोटी, दिशाभुल करणारी व चुकीची असल्याचे लक्षात येते.

३) ग्राहक क्रमांक ०४९९९७०१७९१८ च्या ग्राहकाविषयी चुकीची रीडिंग माहिती दिलेली आहे. प्रत्यक्षात २३०६५ रुपये कमी केलेले असून उत्तरात फक्त ४१८१ रुपये कमी केल्याचे सांगितले आहे. बिलावर रुपये १९७८५ रूपये कमी करून दिले आहेत. त्यामुळे कमी केलेली खरी रक्कम व त्या आधारे आकारलेले वीज बिल यांचा ताळमेळ बसत नाही. ज्या मुळे दिलेली माहिती हि खोटी, दिशाभुल करणारी व चुकीची असल्याचे लक्षात येते.

मात्र,प्रत्यक्ष सुनावणीवेळी तत्कालीन/ विद्यमान जन माहिती अधिकारी हे अनुपस्थित असून, सुनावणीपूर्वी त्यांनी सदर प्रकरणी कोणताही अहवाल आयोगास सादर केल्याचे दिसून येत नाही.

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त कार्यकारी अभियंता,म.रा.वि.वि.कं.मर्या.,व्दारका उपविभाग ,शक्ती भवन, तिगराणीया रोड,व्दारका,नाशिक यांनी सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगाने द्वितीय अपिल क्र. ७९/२०२२/नाशिक संदर्भात दिनांक दि. २२/०२/२०२३ अन्वये पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी करावी.

२. द्वितीय अपिल सुनावणीच्या आदेशाची अंमलबजावणीच्यावेळी कार्यरत(दि. २२/०२/२०२३ रोजी कार्यरत) जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त कार्यकारी अभियंता,म.रा.वि.वि.कं.मर्या.,व्दारका उपविभाग ,शक्ती भवन, तिगराणीया रोड,व्दारका,नाशिक यांनी आयोगाने, व्दीतीय अपील क्र. ७९/२०२२/नाशिक संदर्भात दिनांक दि. २२/०२/२०२३ अन्वये पारित केलेल्या आदेशास अनुसरुन कार्यवाही केली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या १५ दिवसाचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश केले जाऊ शकतील याची नोंद घ्यावी.

३. वरील निर्देशांसह प्रस्तूत तक्रार क्र. **६३४/२०२३/नाशिक** निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

जावक क्र. १२७०

16 FEB 2026